# 'शांतता! कोर्ट चालू आहे' या नाटकाची चिकित्सा

प्रा. दिलीप महादू कोने
मराठी विभाग प्रमुख, ल. भा. पा. महिला महाविद्यालय, सोलापूर.

विजय तेंडूलकर लिखित 'शांतता ! कोर्ट चालू आहे' हे प्रायोगिक नाटक असून रसिकप्रिय ठरले आहे. हे अगदी शीर्षकापासून सर्वार्थाने वेगळे वाटावे असे नाटक आहे. अशा शीर्षकाची आपल्या नाट्यसृष्टीला सवय नव्हती असे म्हणता येईल. रुढ अर्थाने विचार केल्यास या नाटकाला कथानक असे विशेष काही नाही. एका आडगावात अभिरुप न्यायालयाचा प्रयोग करण्यासाठी शहरातली काही हौशी कलाकार मंडळी दुपारी तिथे जाऊन पोहचतात. प्रयोग रात्री होणार असतो. अशावेळी मधल्यावेळेत काय करायचे ? हा प्रश्न उद्भवतो. आडगावात करमणुकेचे दुसरे साधनही नव्हते. रात्री जो प्रयोग होता त्याची तालीम खरे तर व्हायला हवी होती...... पण सारेजण त्याला नकार देतात. सुखात्मे नावाच्या एका कलाकाराला एक अप्रतिम कल्पना सुचली. ती म्हणजे एक वेगळ्याच प्रकारचा हा काल्पनिक खटला कुणावरती चालवायचा. न्यायाधीश, सरकारी वकील, आरोपीचा वकील, साक्षीदार इत्यादी भूमिका सगळ्यांनी वाटून घ्यायच्या आणि सूचेल ते संवाद म्हणायचे, म्हणजे त्यातून प्रत्येकाला एक नवा अनुभव मिळेल अन् वेळही सत्कारणी लागेल. ही कल्पना सर्वांनाच आवडते. सर्वजण साऱ्या भूमिका वाटून घेतात. लीला बेणारे नावाच्या मुलीला आरोपी करतात. तिच्यावर भ्रुणहत्येचा आरोप ठेवतात. आणि खटला सुरु होतो. साक्षीदार तपासले जातात. आरोपीच्या वकिलाची अन सरकारी वकिलाची प्रदीर्घ भाषणे होतात. शेवटी 'कोर्ट तुला जीवंत ठेवून तुझा गर्भ मरेपर्यंत नष्ट करण्यात यावा.' अशी न्यायाधीश शिक्षा जाहीर करतात. इथे नाटकाचा तिसरा अंक संपतो.

या नाटकात कथेला प्राधान्य नाही. एखादी कथा सादर करणे हा या नाटकाचा मूळ उद्देश तर नाहीच नाही. नाटकाला एक वेगळाच आशय आहे. तेंडुलकरांचा उद्देशही वेगळा आहे. हे तसे पाहिले तर फार रुपक आहे. हे रुपक समजले- समजावून घेतले तरच हे नाटक कळते. अन्यथा अत्यंत निरस व कंटाळवाणे वाटते. प्रारंभी हे नाटक फारसे चालले नाही. रसिकांनी या नाटकाकडे पूर्णपणे पाठ फिरविली होत . इतकेच नव्हे तर ज्या नाट्य स्पर्धेसाठी हे नाटक लिहिले., 'रंगायन' या नाट्यसंस्थेने मोठ्या कष्टाने बसविलेले हे नाटक स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत बाद ठरविले गेले. परीक्षकाच्या मते ते नाटकच नव्हते. पण काही दिवसातच या नाटकाला भारतीय नाट्यसंघाने त्या वर्षातील 'सर्वश्रेष्ठ भारतीय नाटक' म्हणून

गौरविले. कमलादेवी चटोपाध्याय; पारितोषिक पटकावले. अन त्यानंतर या नाटकाचे मोल सर्वांना समजले. पुढे या नाटकाने इतिहास घडविला. संपूर्ण महाराष्ट्रात असंख्य प्रयोग झाले. याच दरम्यान तेंडुलकरांच्यावर वाङ्मयचौर्याचा खटला काहीनी दाखल केला होता. एका इंग्रजी नाटकाचा हा स्वैर अनुवाद आहे असे त्यांचे म्हणणे होते. अर्थात तो आरोप फोल ठरला. तेंडुलकारांना खटल्याची पार्श्वभूमी असणाऱ्या अनेक कलाकृतीचा नाटक लिहिताना उपयोग झाला हे खरे.

'शांतता ! कोर्ट चालू आहे' हे एक भव्य असे रुपक नाट्य आहे. मूलत: 'अभिरुप न्यायालय' हेच एक खरे वाटणारे पण खोटे खोटे असणारे नाटक आहे. तेंडुलकरांना या नाटकाचे बीज त्यांच्या मित्रांनी सादर केलेल्या अभिरुप न्यायालयाच्या प्रसंगातूनच मिळाले.

तेंडुलकरांनी समाजातील एका अनिष्ट आणि घातक प्रवृत्तीचा वेध या नाटकाद्वारे घेतला आहे. लहानपणी ऐकलेली एक गोष्ट शाळा सुटल्यानंतर मुले घरी परतताना डबक्यातील बेडकांना दगडाने मारण्याचा खेळ खेळतात. त्यावेळी एक बेडूक मुलांना म्हणतो- "तुमचा होतो खेळ, पण आमचा जातो जीव!" बस्स ! बेडकाने हे अगतिकतेचे काढलेले उदगार हाच या नाटकांचा मध्यबिंदू आहे, केंद्रबिंदू आहे. किंबहुना नाटकाचा तो कणा आहे. तेंडुलकरांनाही प्रेक्षकापर्यंत हाच विचार, मनुष्याची हीच मनोवृत्ती पोहचवायची आहे. या वृत्तीचा कलेच्या अंगाने घेतलेला वेध म्हणजे 'शांतता ! कोर्ट चालू आहे.' हे नाटक होय.

समाजात रुजत चाललेली ही एक विकृती आहे. या विकृतीला वाचा फोडण्यासाठी तेंडुलकरांनी अत्यंत कल्पकतेने या नाटकाची रचना केली आहे. या रचनेचे टप्पे आपण समजावून घेवू या. म्हणजे नाटक समजण्यास सोपे जाईल.

१. समजाचे खेळ खेळणाऱ्या पोरांची प्रतिनिधीत्त्व करण्यासाठी तेंडुलकरांनी सुखात्मे , काशिकर, सामंत, कर्णिक, रोकडे, सौ. काशिकर या पात्रांची योजना केली आहे. खेळ खेळण्याचा सराव सर्वांनाच  आहे. साऱ्या समाजात हा खेळ खोलवर रुजला आहे. यात नोकर, व्यावसायिक, व्यापारी, वकिल, डॉक्टर, प्राध्यापक असे  सर्वच घटक आहेत. खरे पाहता जिच्याशी हा खेळ खेळला जातो ती कु. लीला बेणारे या नावाची शिक्षिका  आहे. अशा सर्वांना तेंडुलकरांनी एकत्र केले आहे. ही सारीच मंडळी अभिरुप न्यायालयाचा प्रयोग करण्यासाठी एका खेडेगावी येतात.
२. हे सारे खेळ केवळ टाईमपाससाठी खेळले जातात हे ठसविण्यासाठी तेंडुलकरांनी या सर्वांना दुपारीच तिथे पाठविले आहे, व त्यांचा प्रयोग रात्री ठेवला आहे. म्हणजे मधला रिकामा वेळ त्यांनी हेतुपुरस्सर निर्माण केला आहे.

३. रिकामा वेळ असल्याने तो कसा घालवायचा ? हा प्रश्य निर्माण होतोच. त्यातूनच तालीम घेण्याचा विचार पुढे येतो. अन्य काही उपायही सुचविले जातात. पण शेवटी अभिरुप न्यायालयाचा प्रयोग करण्यावर एकमत होते.

४. आपापसात भूमिका वाटून घेतात. आरोपीच्या पिंजऱ्यात कु. बेणारेला उभे करतात. तिच्यावर प्रारंभी भ्रुणहत्येचा आरोप ठेवतात. त्यातून अनेक गोष्टीचा उलगडा होत जातो. प्रोफेसर दामलेशी तिचे अनैतिक संबंध असतात. आणि त्यातून तिला दिवस जातात. दामले विवाहित असतात. प्रतिष्ठेच्या भीतीने ते पितृत्त्व नाकारतात. बेणारेला पर्याय कोणताच राहत नाही. पण या साऱ्या खटल्यात जी उलट तपासणी घेतली जाते. त्यातून कु. लीला बेणारे हिचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला जातो.

५. शेवटी सारे मिळून कु. बेणारेला दोषी ठरवतात, व तिला केलेल्या गुन्ह्यासाठी शिक्षा सुनावतात. तेंडुलकरांनी या पाच टप्प्यात नाटकाची रचना केली आहे. त्यांना प्रामुख्याने तीन मुद्द्याकडे लक्ष वेधतात.

a. कु. बेणारेला दोषी ठरवतात व तिला केलेल्या गुन्ह्यासाठी शिक्षा देतात. म्हणजे उपभोगासाठी केवळ मौजे खातर स्त्रियांची शिकार करण्याची वृत्ती दिवसेन् दिवस वाढत जाते.

b. स्त्रिया या भाविनक असल्याने प्रारंभी पुरुषांच्या या वृत्तीला त्या बळी पडतात.

c. समाज या साऱ्या प्रकारात स्त्रीलाच दोषी ठरवतो. या तीन महत्त्वाच्या मुद्याभोवती हे नाटक फिरत ठेवलं आहे. एका रुपकाच्या माध्यमातून इतका गहन प्रश्न मांडण्याचे धाडस तेंडुलकरांनी केले आहे. यामुळे प्रायोगिक रंगभूमीची शान वाढविण्याचे कार्य हे या नाटकाने केले आहे.

**निष्कर्ष :**

१. तेंडुलकरांनी मुर्दाड समाजाचे मोठे प्रत्ययकारी चित्र आपल्यापुढे उभे केले आहे.

२. 'अभिरुप न्यायालयासारखा' एखादा भुक्कड कार्यक्रम. ही त्यातली एक चित्तथरारक घटना आहे. एका चित्तथरारक घटनेची वाट पाहताना आलेला कंटाळा घालवायलाही काही तरी विरंगुळा हवा आहे.

३. केवळ विरंगुळा म्हणून काढलेल्या खेळात एका निरागस जिवाला सहज रक्तबंबाळ करण्याइतके जे अमानुष क्रौर्य या समाजाच्या ठिकाणी आहे. तेही अगदी अर्थशून्य, हेतुशून्य आहे.

४. केवळ जिवाची घटकाभर करमणूक एवढाच अर्थ त्या अमानुष, क्रौर्याला आहे. आणि हीच या समाजाची खरी शोकांतिका आहे.

**संदर्भ :**

१. शांतता कोर्ट चालू आहे – विजय तेंडूलकर